| | |
|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**<br>**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**<br>**फोन नं. ०२२-२९४५१००१**<br>Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in |

**प्रेसनोट क्रमांक ३१२** **दिनांक ०५/११/२०२१**

## २७६ ग्रॅम वजनाचा २२,०८,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ बाळगणाऱ्या तीन ईसमांवर कारवाई- अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कामगिरी

दि. ०३/११/२०२१ रोजी रात्री. २३:२५ वा.चे सुमारास मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस अधिकारी व अंमलदार हे मिरारोड पोलीस ठाणेचे हदिदत गस्त करीत असताना त्यांना मॅकडॉनल्ड सिग्नल बस स्टॉप जवळ एक संशयीत इसम मिळुन आला. सदर ईसम नामे फरहाद कमरु जमान बिश्वास, वय १९ वर्षे, रा. निदा व्हिला, काशिमीरा गांव, काशिमीरा, ता. जि.ठाणे. याचे कब्ज्यात अंमली पदार्थ विरोधी_पथकास ५ ग्रॅम वजनाचा व ४०,०००/- रुपये किंमतीचा मॅफेड्रॉन अंमली पदार्थ हा मिळून आला. त्यास नमुद अंमली पदार्थ विक्रीकरीता पुरविणाऱ्या ईसमाबाबत विचारणा केली असता माहिती मिळाली कि, इसम नामे अरबाज निसार खान ऊर्फ कासीम याने अकील अहमद सईद अहमद अन्सारी वय २२ वर्षे, रा.संघवी एम्पायर, एफ.२०१, हैदरी चौक, नयानगर, मिरारोड (पुर्व) याचे मार्फतीने मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता पुरविला होता. त्यांनतर अंमली पदार्थ विरोधी पथकास अरबाज निसार खान ऊर्फ कासीम याचे कब्ज्यात व त्याचे स्वतःचे रहाते घरात एकुण २७१ ग्रॅम वजनाचा व २१,६८,०००/- रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला. सदर कारवाई मध्ये मॅफेड्रोन हा अमली पदार्थ, मोबाईल व मो. सायकल असा एकुण २४,५५,१७०/- रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. नमुद आरोपीतां विरुध्द मिरारोड पोलीस ठाणे गु.र.क्र. ।। ३७३ /२०२१ अमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २० (क), २९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन तीनीही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. विजय चव्हाण नेमणुक-मिरारोड पोलीस ठाणे, अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे सहा. पोलीस निरीक्षक, श्री. विलास कुटे, म.स.पो.नि. तेजश्री शिंदे नेमणुक-भरोसा सेल, पो.हवा. धनाजी इंगळे, पो.ना. पवन पाटील, विनोद राउत, पो.शि. अजय यादव, नेमणुक-गुन्हे शाखा यांनी केली आहे.

---------ooooo-----------